महाराष्ट्र शासन


# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैदयकीय महाविदयालय अंबाजोगाई जि. बीड

## अधिष्ठाता यांचे कार्यालय

**SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST. BEED**

P(02446)245792/248963/249362/248438/ FAX-02446/247132 website www.srtrmca.org email- srt.acad@rediffmail.com


जा.क्र./स्वारातीग्रावैम/अस्थाराज/ ९९५२ /२०२५ दिनांक :- 31/12/2025

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी,
प्रशासकीय ईमारत, तहसिल कार्यालय परिसर,
नगर रोड, बीड.

विषय :- प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक (चिकीत्सालयीन व अचिकीत्सालयीन विषय) या पदासाठी करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत....

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मा.संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड यांच्या आस्थापनेवरील प्राध्यापक (चिकीत्सालयीन)व सहयोगी प्राध्यापक ( अचिकीत्सालयीन विषय) ही पदे करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत या पत्रासोबत जोडण्यात येत असलेली जाहिरातीची सूचना जास्त खप असलेल्या अग्रगण्य वर्तमानपत्रां मध्ये प्रसिद्ध करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| ०१ | कार्यालयाचे नाव दुरध्वनी व ई-मेल पत्ता<br>स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्याल, अंबाजोगाई.<br>दुरध्वनी क्रमांक<br>ई-मेल क्रमांक | संस्थेचे नाव व पत्ता<br>स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्याल, अंबाजोगाई.<br>दुरध्वनी क्रमांक ०२४४६-२४८४३८<br>email :- srtrgmca@gmail.com |
| ०२ | जहिरातीची सूचना प्रसिद्ध करण्याची अंतिम तारीख | दिनांक2/०१/२०२६ |
| ०३ | प्रसिद्धीचे स्वरुप | राज्यस्तरीय. |
| ०४ | प्रसिद्धीकरीता शिफारस करण्यात आलेले वृत्तपत्र | जास्त खप असलेल्या राज्यस्तरीय अग्रगण्य एक मराठी व एक इंग्रजी वर्तमानपत्रांमध्ये |
| ०५ | किती वेळा प्रसिद्ध करावयाची आहे. | एक वेळ. |
| ०६ | देयके प्रदान करण्याकरिता कोणत्या नावाने पाठविण्यात यावे. | अधिष्ठाता,स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड. |

सोबत :- जाहिरातीची सुचना.

(डॉ.श.स.धपाटे)
अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैदयकीय महाविदयालय अंबाजोगाई जि. बीड
अधिष्ठाता यांचे कार्यालय

SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT. MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST. BEED
P(02446)245792/248963/249362/248438/ FAX-02446/247132 website www.srtrmca.org email- srt.acad@rediffmail.com

जा.क्र./स्वारातीग्रावैम/अस्थाराज/ 9953 /२०२५ दिनांक 31/12/2025

**जाहिरात**

विषय :- वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड येथील चिकीत्सालयीन विभागातील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रिये मार्फत करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत.

संदर्भ :- सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७.१२.२०१६.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड येथील चिकीत्सालयीन विभागातील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे संस्थास्तरावरुन करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याकरिता इच्छुक पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक पात्र उमेदवारांकडून मागविण्यात येत असलेले अर्ज निम्नस्वाक्षरीतांच्या www.srtrmca-org या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते दिनांक १२१.०१.२०२६ रोजी सायंकाळी ५ .वाजेपर्यंत (शासकीय सुट्टी वगळून) अर्ज ऑफलाईन पध्दतीने स्विकारले जातील. उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अर्जासोबतजोडुन मुदतीत कार्यालया मध्ये शासकीय सुट्टी सोडून जमा करावेत. ज्यांना ऑफलाईन कार्यालयात अर्ज पाठविणे शक्य नाही, अशा उमेदवाराने सर्व अर्ज भरुन स्कॅन करुन आवश्यक ती कागदपत्रे स्कॅन करुन जोडून srtrgmc@gmail.com या वर मुदतीत पाठवावेत.अर्हता (शैक्षणिक, अनुभव व इतर) व पदांची उपलब्धतेची माहिती सोबत तसेच, www.srtrmca.org वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच, करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीबाबतची माहिती मा. संचालनालयाच्या संकेत स्थळावर सुद्धा प्रसिद्धीसाठी देण्यात आलेली आहे.

(डॉ.शं.से.धपाटे)
अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.

संस्थेच नाव :- स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड.

Scanned with OKEN Scanner

टिप:- सदर जाहिरातीमधील नमुद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पुर्णत: रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

**महत्वाची टिप :-**

१. उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
२. उमेदवाराचे वय : नियुक्ती वेळेस दिनांक 13.०१.२०२६ रोजी कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.
३. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पद्धतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकां बरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहित केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.
४. **मानधन**
(अ) सेवानिवृत्त अध्यापकांची करार पद्धतीने नियुक्ती झाल्यास त्यांना शासन निर्णय दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतूदीनूसार दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.
(ब) खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) यांना खालील नमूद केल्या प्रमाणे दरमहा मानधन अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | पद | विषय | दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| ०१ | प्राध्यापक | चिकीत्सालयीन | रु.२,००,०००/-<br>अक्षरी : रु.दोन लाख फक्त |
| ०२ | सहयोगी प्राध्यापक | चिकीत्सालयीन | रु.१,८५,०००/-<br>अक्षरी रु.एक लाख पंच्याऐंशी हजार फक्त |

**नियम व अटी:**

१) करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी या पैकी जे अगोदर घडेल इतका राहील. तथापी सदरहु पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवारांच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.
२) उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणुक या कारणांसाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पुर्व सुचने शिवाय संपुष्टात येईल.
३) करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापीत मानांकानुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमुन दिलेली विवक्षीत कामे पार पाडणे आवश्यक राहील.
४) वरीलप्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्ये व जबाबदा-यांवर विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारांस खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.
५) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्ती साठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवाप्रयोजनांसाठी ग्राहय धरला जाणार नाही.
६) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांस त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील.
७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/ माहिती आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.
८) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशसकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

कृपया मागील पानावर

Scanned with OKEN Scanner

९) उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणा-या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणीक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.

१०) बिगर सेवानिवृत्त गटातून करार पद्धतीने नियुक्त होणा-या अध्यापकांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पुर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

११) अर्जदाराने संबंधीत पदासाठी शरीरीक दृष्ट्या पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२) सदर जाहीराती मध्ये नमूद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पुर्णतः रद्य करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांच्याकडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

१३) नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणे बाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांना राहतील.

१४) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१५) अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. (मुलाखतीचे वेळापत्रक वेगळ्याने कळविण्यात येईल)

१७) मुलाखतीला येताना उमेदवारांनी Online सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

(डॉ.शं.स.धपाटे)
अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई.

Scanned with OKEN Scanner

प्र. अधिष्ठाता
स्वा.रा.ती.ग्रा.शा.व.म. अंबाजोगाई
जावक क्रमांक 9954
दिनांक 31/12/2025

रिक्त पदांचा तपशिल :- प्राध्यापक. एकूण पदे-०३

| अ. क्र. | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| ०१ | मनोविकृती शास्त्र | ०१ | M.D.(Psychiatry)/ M.D. (Psychological Medicine)/ M.D.(Medicine with Diploma in Psychological Medicine)/ DNB (Psychiatry)- | As per notification 14.02.2022 Associate professor in the subject for 03 years in a permitted/Approval/Recognized Medical College/Institute) (ii) should have(at least four Research Publication only original papers, meta-analysis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Medicine Pubmed Central, Citation index, Science Citation index, Expande Embassy, Scopus, Directory of open excess journals (DoAJ)) will be considered The author must be amongst first three or should be the corresponding author. iii) Should have completed the basic course in biomedical research from institution (s)Designated iv) As per N.M.C.New Delhi Guidelines. |
| २ | दंतरोगशास्त्र | ०१ | M.D.S.(Dental) | |
| ३ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०१ | M.D.(Skin& VD) | |

DEAN
S.R.T.R.Govt. Medical College,
Ambajogai

Scanned with OKEN Scanner

मा. अधिष्ठाता कार्यालय
स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. अंबाजोगाई
जावक क्रमांक 9455
दिनांक 31/12/2025

संस्थेच नाव :- स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड.
रिक्त पदांचा तपशिल :- सहयोगी प्राध्यापक.एकूण पदे-०८

| अ. क्र. | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| ०१ | शरीररचना शास्त्र | ०१ | M.S.(Anatomy) | As per notification 14.02.2022<br>1) Assistant professor in the subject for 04 years in a permitted/Approval/Recognized Medical College/Institute)<br>ii ) should have(at least two Research Publication only original papers, meta-analysis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Medicine Pubmed Central, Citation index,Science Citation index, Expande Embassy, Scopus, Directory of open excess journals (DoAJ)) will be considered<br>The author must be amongst first three or should be the corresponding author.<br>iii) Should have completed the basic course in biomedical research from institution (s) Designated by NMC.<br>iv) As per recent N.M.C. New Delhi Guidelines. |
| ०२ | शरीरक्रियाशास्त्र | ०१ | M.D. (Physiology) | |
| ०३ | जीवरसायनशास्त्र | ०१ | M.D.(Biochemistry) | |
| ०४ | शरीरविकृतीशास्त्र | ०२ | M.D. (Pathology) | |
| ०५ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०१ | M.D.(Skin and V.D.) | |
| ०६ | बालरोगशास्त्र | ०१ | M.D. Pediatrics | |
| ०७ | कान,नाक व घसाशास्त्र | ०१ | M.S.(E.N.T.) | |
| ०८ | क्ष-किरणशास्त्र विभाग | ०१ | M.D. (Radiology) | |

DEAN
S.R.T.R.Govt. Medical College,
Ambajogai

Scanned with OKEN Scanner